## नियमित दिवाणी दावा क्रमांक १९/२०२५ मधील निशाणी क्रमांक ५७ खालील आदेश

## (CNRNO-MHRT080001262025)

वादीतर्फे युक्तीवादासाठी कोणीही हजर न झाल्याने त्यांच्या युक्तीवादाशिवाय अर्ज पुढे चालविण्यात आला. प्रतिवादी क्र. ०१ व ०४ तर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

०२. प्रस्तुतचा दावा हा वाटप व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा हा अद्याप प्राथमिक स्थीतीत प्रलंबित असल्याचे दिसून येते.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांच्याविरूध्द विना कैफियत दावा चालविण्याचा आदेश दिनांक २८/०७/२०२५ रोजी पारीत झाल्याचे दिसून येते. अर्जातील कारण, दाव्याचे स्वरुप व सद्याची दाव्याची प्रलंबित स्थीती लक्षात घेता, उभयपक्षकारांमध्ये वादाचे मुद्दे अंतिमतः निकाली काढण्यात व भविष्यातील उभयपक्षकारांचे न्यायालयीन कामकाजाचे प्रमाण टाळण्यास, प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे, न्यायोचित वाटते. प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेतल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे दिसून येत नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणार नाही. त्यामुळे, सदर प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे दिसून येते. परंतू, तसे करताना न्यायालयाच्या झालेल्या वेळेचे नुकसान दुर्लक्षीत करुन चालणार नाही. सबब, खर्चाच्या अटीवर अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे–

**आदेश**

१. अर्ज वादीला पुढील तारखेस किंवा त्यापूर्वी प्रतिवादी क्र. ०१ व ०४ यांनी एकत्रीतपणे रक्कम रुपये ४००/– (रक्कम रुपये चारशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. आदेशान्वये पूर्तता केल्यानंतर पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.21 18:15:38 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**दिनांकः २१/०२/२०२६** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवरुख,**

**ठिकाणः देवरुख.** **जि. रत्नागिरी.**

-: **C E R T I F I C A T E** :-

I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Evidence/Order/Judgment .

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. A. Bhale |
| Court Name | : | The Court of Civil Judge Junior Division and Judicial Magistrate F.C., Deorukh. |
| Date of Decision | : | 21/02/2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 21/02/2026 |
| Order uploaded on | : | 21/02/2026 |